भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2020 ◐ XY 257448

सोलापूर अनुक्रमांक -32090 दिनांक -31/12/2020

श्री./सौ. खादिमाने ऊर्दू फोरम सोलापूर

यांनी रु. 0100 चा जनरल स्टॅम्प मागितलेवरुन हा

रु. 100 चा व भरतीस रु. 454

चे जनरल स्टॅम्प दिले.

कोषागार कार्यालय सोलापूर
29 JAN 2021
मुद्रांक प्रमुख लिपिक / उपलेखापाल

**प्रताप सत्यवान सूर्यवंशी**

शहर मुद्रांक विक्रेता-कोड नं. २५०१०४०

परवाना क्र.७०, दि. ३०/६/१९९८

ऑफिस नं. ०९, लोखंडवाला कॉर्नर,

१४५, सिध्देश्वर पेठ, सोलापूर - २.

सामंजस्य करार

**MOMORANDUM OF UNDERSTANDING**

**BETWEEN**

ऊर्दू विभाग,

भाषा व वाङ्मय संकुल

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

आणि

खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर

Khaadiman-e-Urdu Forum, Solapur

प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

* समन्वय आणि अंमजबजावणी

1. सदर कराराची जबाबदारी, समन्वयक आणि अंमलबजावणीसाठी, खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूरचे अध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच विद्यापीठाचे कुलसचिव, भाषा व वाङ्मय संकुलाचे संचालक आणि ऊर्दू विभागाचे समन्वयक काम करतील.

2. सदर सामंजस्य करार 100 रूपयेच्या स्टॅप पेपरवर, कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून तीन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

3. सदर परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयक अधिकाऱ्यात होत आहे. तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षापर्यंत अंमलात येत आहे.

संचालक
भाषा व वाङ्मय संकुल
डॉ. प्रभाकर कोळेकर
**Director**
**School of Languages and Literature**
**Punyashlok Ahilyadevi Holkar**
**Solapur University, Solapur**

कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

डॉ. म. शफी चोबदार
सचिव
खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर
**Khaadiman-e-Urdu Forum, Solapur**

वकार अहमद शेख
अध्यक्ष
खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर
**Khaadiman-e-Urdu Forum, Solapur**

प्रस्तावना

ऊर्दू शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये ऊर्दू भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, शोधनिबंधाना पारितोषिक, ललित, ललितेतर, संपादित ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. विद्यापीठाच्या ऊर्दू विभागामार्फत विविध उपक्रम आयोजित केले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याचे काम केले जाते. या सामंजस्य करारातून खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर या संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करता येईल. विद्यार्थी केंद्रीत उपक्रमांसाठी विद्यापीठाचा ऊर्दू विभाग व खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर यांच्यात हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

वरील नमूद केलेल्या खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर (स्थापना 2017, रजि. क्र. : MAHA403/2017-F-28173SO) आणि ऊर्दू विभाग भाषा व वाङ्मय संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या संस्था दिनांक 07/07/2021 रोजी एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत. सदर कराराची अंमलबजावणी पुढील पाच वर्षसाठी करण्यात येईल. या कराराची उदिदष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत :

उदिदष्टे :

1. ऊर्दू भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.
2. साहित्य संमेलन, चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.
3. विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी केंद्रित विविध उपक्रमांसाठी सहयोग व सहकार्य करणे.
4. निबंध, वक्तृत्व, वाद–विवाद, प्रश्नमंजुषा कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथा–कथन इ. स्पर्धांचे आयोजन करणे.
5. व्यक्तिमत्त्व विकास व कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.
6. सर्जनशील लेखन व उपयोजित ऊर्दू लेखन प्रकल्प राबविणे.
7. विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करण्यासाठी सहकार्य करणे.
8. ऊर्दू भाषेतील दर्जेदार साहित्यकृती विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देणे.
9. विद्यार्थ्यांना साहित्य निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे. त्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे.
10. ऊर्दू भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करणे.

Khaadiman-e-Urdu Forum, Solapur

प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

- अटी आणि शर्थी :

1. विद्यापीठातील ऊर्दू विभागाच्या विविध उपक्रमामध्ये खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर ही संस्था सक्रीय सहभाग घेईल. तसेच खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूरच्या विविध उपक्रमांमध्ये विद्यापीठातील विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होतील.
2. खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर या संस्थेचा एखादा उपक्रम विद्यापीठाच्या ऊर्दू विभागाने राबवायचा असल्यास संकल्पित आर्थिक तरतूद संस्था करेल. मूलभूत सोई विद्यापीठाने उपलब्ध करावयाच्या आहेत. तरतूदीपेक्षा अधिक खर्च झाल्यास परस्पर चर्चेतून सामंजस्याने सहकार्य करणे अपेक्षित आहे.
3. परस्पर सामंजस्य करारातंर्गत होणा–या कोणत्याही उपक्रमाकरिता कोणत्याही प्रकारचा भत्ता देणे बंधनकारक नाही.
4. सामंजस्य करारातंर्गत झालेल्या कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांच्या माहितीची गोपनीयता राखणे संस्थेला बंधकार राहील.
5. सदर करार नाम्याच्या अनुषंगाने काही वाद अथवा असहमतीचे मुद्दे उपस्थि झाल्यास दोन्ही पक्षांनी मा. कुलगुरू यांच्या सोबत चर्चा करयचे आहे व चर्चेअंती कुलगुरू यांनी घेतलेला निर्यण दोन्ही पक्षांना बंधनकारक असेल.
6. वर नमूद केल्याप्रमाणे करारनामा विहीत कालाधी आधी रद्य करावयाचे झाल्यास या प्रकरणी सर्व बाबींची व या प्रकरणी विविध कार्यक्रमांसाठी झालेल्या खर्चाबाबत विद्यापीठ व संस्था आपआपल्या विषयाप्रमाणे जबाबदारी स्वीकारून कार्यवाही करतील तसेच संस्थेने सामंजस्य करारातंर्गत कार्यक्रमाची / उपक्रमाची महत्त्वाचे रेकॉर्ड व तपशील विद्यापीठाकडे हस्तांतरित करावे लागेल.
7. सदर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपूष्टात येईल. परस्परसंहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.
8. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.
9. सामंजस्य किंवा सहकार्य करारा संदर्भात कोणत्याही स्वरूपाचा वाद उद्‌भवल्यास संबंधित प्रकरण हे सोलापूर जिल्हा सत्र न्यायालयाच्या आधीन राहील.

Khaadiman-e-Urdu Forum, Solapur

प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

➢ **एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे :**

1. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये सहकार्य करणे.
2. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.
3. उपलब्ध साधन सामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.
4. ऊर्दूभाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे.
5. विद्यार्थी केंद्रित उपक्रम आयोजित करणे. त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे. शैक्षणिक व ऊर्दूभाषा विकासासाठी विविध उपक्रम राबविणे व त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे.

**समारोप :**

प्रस्तुत करार हा केवळ शैक्षणिक व ऊर्दू भाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम घेण्यासाठी करण्यात आलेला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध उपक्रमामध्ये सहभागी करून घेता येईल. तसेच खादिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर या संस्थेच्या माध्यमातून विद्यापीठामध्ये विविध उपक्रम घेता येतील. विद्यार्थ्यांना ऊर्दू साहित्याची माहिती करून देणे. त्यांना साहित्याची आवड निर्माण होईल या दृष्टीने प्रयत्न करणे. यासाठी एकमेकांना आवश्यक ते सहकार्य करणे हा या कराराचा मुख्य हेतू आहे.

Khaadiman-e-Urdu Forum, Solapur

प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.